

मनोरंजक कथा
श्याम कुरळे
परी प्रकाशन




**मनोरंजक कथा**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका


१. त्यागी गुणवती .............. ५
२. प्रतापी प्रताप ............... ११
३. भाग्यवान भास्कर ........... १४
४. चुकार मेंढरू ............... १६
५. उद्योगी बाळू ................ २०
६. दैव देते कर्म नेते ............ २२
७. अतृप्त आत्मा .............. २५
८. ते मला माहीत आहे .......... २९
९. चार गोष्टी हिताच्या .......... ३५
१०. गुलांमाचा देवदूत ........... ३८
११. चिवट गाठी आणि गाडगेबाबा ३९
१२. चतुर चंदू ................... ४१
१३. अतूट साखळी .............. ४४
१४. बोधी वृक्षाच्या छायेखाली ... ४७
१५. मूळ स्वभाव जाईना ......... ५१
१६. व्हायला गेला राजा .......... ५३
१७. मौल्यवान वस्तू ............ ५६
१८. चिलीमरायाची बाचणी ...... ६१
१९. सोन्याच्या सापाचा चमत्कार.. ६४
२०. पिंटू आणि पिटुकलं ........ ६६
२१. ऋण मुक्तीची अजब रीत .... ६९
२२. चेटकिणीशी सामना ........ ७१
२३. अद्‌भुत अंगठी .............. ७८
२४. आगीतून फोफाट्यात ....... ८१
२५. उंदराचा हुकूमनामा .......... ८४
२६. लक्ष्मीची कृपा............... ८७
२७. जादूचे अस्वल ............. ९४
२८. विचित्र सजा ................ ९९
२९. खोट्याच्या कपाळी गोटा ... १०२
३०. योग्य उपाय.................. १०४
३१. शेरास सव्वाशेर .............. १०७
३२. बिलंदर व्यापारी ............. १०८
३३. काम आणि भेदभाव......... १११
३४. यशाची वाट ................ ११३
३५. खरं की खोटं ............... ११४
३६. प्रसंग छोटा, संस्कार मोठा ! .. ११६
३७. मारुती आश्चर्यचकित... .... ११७
३८. डोळस आंधळा ............. ११९
३९. भागू भगिणीची दंतकथा .... १२१
४०. सवतकड्याची दंतकथा ..... १२२
४१. बहीण–भावाची दंतकथा .... १२३
४२. किस्से शालेय सहलींचे ...... १२५
४३. अहंकारी बेडूक ............. १३४
४४. साप, मुंगूस आणि जादूगार... १३८
४५. उतावीळपणाची सजा ....... १४२
४६. फितुर कोल्हा ............... १४४
४७. हुरळलेली मेंढी .............. १४७
४८. सांग सांग भोलानाथ ........ १४९
४९. कदमाघरची कामधेनू ........ १५३
५०. चुकार मेंढरू ............... १५६
५१. दानत ........................ १५८
५२. गरिबाचं पोर झालं किती थोर ! १५९
५३. गाडी कशी बुडाली ? ....... १६२
५४. अस्वलाशी झुंज ............ १६५
५५. जशी इच्छा तसे फळ ........ १६७
५६. मातृहृदय .................... १६८

# त्यागी गुणवती

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा राज्य करीत होता. राजाच्या राणीचं नाव होतं रूपमती. नावाप्रमाणेच ती रूपवान होती. स्वभावानं मात्र फारच हट्टी. तशात राजाची आवडती. त्यामुळे ती वारंवार विचित्र हट्ट करीत असे. तिचे हट्ट पुरविताना राजाचा जीव मेटाकुटीस येई. राणीला त्याचे काहीच वाटत नसे. राजा खूप सहनशील होता. राणीला तो तिळमात्र दु:ख देत नव्हता. दु:ख मात्र तिचा पाठलाग करीत होते; कारण तिला मूलबाळ नव्हते.

वर्षामागून वर्षे निघून जात होती. संतानप्राप्तीसाठी राणी व्रतवैकल्ये करीत होती. देव–देवतांना नवस–सायास करीत होती. पण तिला संतानप्राप्ती काही होत नव्हती. त्यामुळे दिवसेंदिवस ती निराश–हताश होत होती. तशातच राजाने दुसरा विवाह करावा म्हणून सर्व प्रधानमंडळाने राजामागे सारखा लकडा लावला. त्यामुळे तर राणी अधिकच दु:खी– कष्टी बनली होती.

राजा मात्र प्राप्त परिस्थितीत समाधान मानत होता. स्वत:ला मूलबाळ नसल्याचा त्याला फारसा खेद वाटत नव्हता. प्रधानमंडळाची मात्र अशी समजूत झाली होती की, राणी रूपमतीच्या दडपणामुळेच राजा दुसऱ्या विवाहास तयार होत नसावा. त्या समजुतीमुळेच एके दिवशी सर्वांनी राणीच्या महालासमोर धरणे धरले होते. राणीने राजाला दुसरा विवाह करण्यासाठी संमती द्यावी म्हणून ते आग्रह करीत.

प्रधानमंडळाचा तो आग्रह ऐकून राणीच्या मनात राजाविषयी गैरसमज निर्माण झाला होता. दुसरा विवाह करण्याची राजाचीच इच्छा असावी असे तिला वाटत होते. आपल्यावर दडपण आणण्यासाठी राजानेच प्रधानमंडळाला आपल्या महालासमोर धरणे धरण्यास प्रवृत्त करण्याचा कावेबाजपणा केला असावा, अशी कुशंकाही तिच्या मनात घर करून बसली होती. त्यामुळे राजा दुसरा विवाह करणार आहेच तर त्याचे श्रेय प्रधानमंडळाला घेऊ न देता स्वत:च का घेऊ नये, असा धूर्त विचार तिने केला होता. राजाच्या विवाहासंबंधी एकांतात स्वत:हून तो विषय काढण्याच्या संधीची ती वाटच पाहात होती.

एके दिवशी तिला ती संधी मिळाली. राजा तिच्या महालात आला असताना ती म्हणाली, 'महाराज, आजवर आपण माझे अनेक हट्ट पुरविले, तसा आणखी एक हट्ट पुरवावा.'

स्वत:ला कितीही कष्ट पडले तरी राणीचे हट्ट पुरविण्यात आनंदच मानणारा राजा अभावितपणे म्हणाला,

'राणीसरकार, आपला कोणताही हट्ट पुरविण्यास आम्ही बांधील आहोत. बोला, आपलं काय मागणं आहे?'

राणी धूर्तपणे उत्तरली,

'आजवर मी स्वत:साठी खूप मागितलं, पण आता या राज्यातील प्रजेसाठी एक मागणं मागण्याचा हट्ट मी धरणार आहे.'

प्रजेच्या हिताच्या मागण्या पूर्ण करण्यात सदैव तत्पर असणारा राजा आनंदाने म्हणाला,

'तसं असेल तर आपला हट्ट पूर्ण करण्यात मी धन्यताच मानीन.'

राजाचं उत्तर ऐकून राणीला मनातून खूप दु:ख झालं होतं, पण चेहऱ्यावर ते दिसू न देता ती म्हणाली,

'महाराज, माझ्यापासून आपणास संतानप्राप्ती होईलसं वाटत नाही, तेव्हा आपण दुसरा विवाह करावा असं मला फार दिवसांपासून वाटतं.'

राणीच्या अनपेक्षित बोलण्यानं आश्चर्यचकित झालेला राजा उत्तरला,

'राणी सरकार, दुसऱ्या विवाहाची पुसटशी कल्पनाही माझ्या मनाला कधी स्पर्श करू शकली नाही. आपल्या नशिबी असेल तर पुढेमागे आपल्याला संतानप्राप्ती होणार नाही कशावरून?'

राजाच्या प्रश्नावर समजूतदारपणाचा आव आणून राणी उत्तरली,

'महाराज, मृगजळामागे धावण्यात काय अर्थ? खूप वाट पाहिली, पण व्यर्थ. आता निष्कारण वेळ दवडू नये. संतान-प्राप्तीसाठी आपण दुसरा विवाह करण्यातच सर्वांचं हित आहे.'

'ते कसं काय?'

'त्यामुळं आपल्या वंशाची वेल वाढत राहील.'

'आपल्या मृत्यूनंतर मागे वाढलेली वंशाची वेल पाहायला आपण येणार आहोत का?'

'असा विचार करून जगरहाटी कशी चालेल महाराज?'

'त्याची चिंता करायला देव समर्थ आहे. एकाचा निर्वंश झाला म्हणून जग ओस पडणार नाही.'

'पण आपल्या राज्याला योग्य वारस हवा ना?'

'तो आपल्या प्रजेतूनही मिळू शकेल.'

'आपण आपलं राज्य दुसऱ्याच्या पदरात टाकायचं?'

'काय हरकत आहे? मला शक्य होणार नाही त्या दिवशी या राज्याची धुरा वाहू शकणाऱ्या एखाद्या समर्थ जवानाच्या हाती राज्याची सूत्रे मी अगदी आनंदाने सुपूर्त करू शकेन.'

राजाचे ते उद्‌गार ऐकताच तो मनापासून न बोलता त्राग्यानेच बोलत असावा असा दुराग्रह करून घेऊन राणी उत्तरली,

'महाराज, आपणास संतानप्राप्तीची गरज वाटत नसली तरी मला ती वाटते. आपण माझ्या हट्टासाठी तरी दुसऱ्या विवाहाला संमती द्यायलाच हवी.'

'पण दुसरा विवाह करूनही संतानप्राप्ती नाही झाली तर?'

'तो प्रश्न नंतरचा. आधी आपण माझा हा हट्ट पुरवावा.'

'राणी सरकारांचा तसा हट्टच असेल तर होऊ द्या आपल्या मनासारखं.'

'होईलच, पण एक अटही आहे.'

'कोणती?'

'दुसऱ्या राणीला पुत्रप्राप्ती होताच तिचा शिरच्छेद करण्यात यावा!'राणीच्या त्या विचित्र अटीने राजा क्षणभर हादरलाच. राणीची अमानुष अट पूर्ण करणे दयाळू अंत:करणाच्या त्या राजाला शक्यच नव्हते. पण राणी अगदी हट्टालाच पेटली होती. शेवटी राजाचा नाइलाज झाल्यामुळे पुढचे पुढे पाहता येईल या विचाराने तो विवाहास तयार झाला.

राणीच्या हट्टासाठी राजा दुसऱ्या विवाहास तयार झाला, पण राणीची ती विचित्र व अमानुष अट ऐकून राजाशी आपल्या कन्येचा विवाह करण्यास कुणीही तयार होईना. प्रधानमंडळाने सर्व



राज्यांतून दवंडी पिटवली, वधू-पित्यास पाच हजार सुवर्ण मोहरा देण्याचे अमिष दाखविले तरीही राजासाठी वधू मिळेना. राणीने आपली अमानुष अट मागे घ्यावी म्हणून प्रधानमंडळाने राणीच्या खूप विनवण्या केल्या, पण राणी आपली अट मागे घ्यायला मुळीच तयार होईना. प्रधानमंडळापुढे मोठी समस्याच उभी राहिली. इतक्यात एक आश्चर्यकारक घटना घडली.

एक सुंदर मुलगी स्वत:हून राजाशी विवाह करण्याच्या इच्छेने राजदरबारी हजर झाली. राजासह सर्व प्रधानमंडळालाही मोठे नवल वाटले. राजाने आश्चर्याने त्या मुलीस विचारले,

'राणीच्या अमानुष अटीची त्या मुलीस कल्पना नाही का?'

मुलीने होकारार्थी मान डोलावताच राजाने विचारले,

'मग स्वत:हून मृत्यूला कवटाळायला तू का तयार झालीस?'

राजाच्या प्रश्नावर धीटपणे ती उत्तरली,

'महाराज, माझे माता-पिता आणि बहीण- भावंडे अत्यंत दारिद्र्यात दिवस कंठीत आहेत. दोन भाऊ रात्रंदिन काबाडकष्ट करून कसंतरी पोट भरतात. मोठी बहीण घरीच असते. गरिबीमुळे तिचा विवाह होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत मी आपल्याशी विवाह केला तर त्या बदल्यात मिळणाऱ्या पाच हजार सुवर्णमोहरांमुळे माझ्या कुटुंबातील सर्वांचे प्रश्न सहजपणे सुटून त्यांना सुखा-समाधानात जगता येईल.'

त्या मुलीचे हे स्पष्टीकरण चालू असतानाच राणी रूपमतीही दरबारात आली होती. ते स्पष्टीकरण ऐकून राणी काही बोलणार तोच राजा त्या मुलीस म्हणाला,

'तुझ्या विवाहाने तुझ्या कुटुंबियांचं निश्चितच भलं होईल, पण त्यासाठी तुझा बळी जाईल त्याचं काय?'

राजाच्या प्रश्नावर निर्धारपूर्वक ती मुलगी उत्तरली,

'महाराज, मला माझ्या जिवाची मुळीच फिकीर नाही. जगासाठी मी काही करू शकत नसले, तरी माझ्या कुटुंबियांच्या सुखासाठी तरी मी हा त्याग करू शकले, एवढं तरी समाधान मला नक्कीच मिळेल.'

त्या मुलीचे उद्‌गार ऐकून राणी रागाने धुसफुसतच राजास म्हणाली,

'ही स्वत:हून विवाहास तयार असताना आपण भलतेसलते प्रश्न विचारून तिच्या मनात भीतीची भावना का निर्माण करता?'

राणीच्या प्रश्नावर निरुत्तर होऊन राजा एकदा त्या मुलीकडे तर एकदा राणीकडे पाहातच राहिला. राणीने तोऱ्यातच त्या मुलीस विचारले,

'नाव काय गं तुझं?'

'गुणवती.' मुलीने विनयाने उत्तर देताच राजा अभावितपणे उद्‌गारला,

'छान! नावाप्रमाणेच गुणवान आहेस!'

राजाने त्या मुलीची स्तुती करताच संतप्त झालेली राणी उत्तरली,

'गुणगान पुरे, मनासारखी वधू मिळाली ना? मग आता विवाहाच्या तयारीला लागा.'

राणीच्या बोलण्यावर कळवळून राजा म्हणाला,

'मी अजून सांगतो राणीसरकार, मला दुसऱ्या विवाहाची काही गरज नाही.'

'आपणास गरज नसली तरी आपल्या प्रधानमंडळासह साऱ्या प्रजेला तशी गरज आहे. माझा तर तसा हट्टच आहे. आपणास तो पुरवावाच लागेल!'

राणीच्या हट्टानुसार गुणवतीशी राजाचा विवाह पार पडला. प्रधानमंडळाने जाहीर केल्यानुसार गुणवतीच्या कुटुंबियांना पाच हजार सुवर्णमोहरा अर्पण केल्यामुळे त्यांचे दारिद्र्य संपुष्टात आले. सर्वांच्या इच्छा पूर्ण होऊन ते समाधानात जगू लागले.

अशीच दोन वर्षे निघून गेली. गुणवतीच्या सहवासात राजाला खरं सुख लाभू लागलं. तिला संतानप्राप्ती होऊ नये असं राजाला वाटू लागलं. पण माणसाला कधी कधी जे घडू नये असं वाटतं, त्याच्या नेमकं उलट घडतं. राजाच्या बाबतीत असंच घडलं. गुणवतीला बाळ होणार असल्याची वार्ता गुणवतीने राजाच्या कानी घातली आणि राजाची मुद्रा काळवंडली. गुणवतीला संतानप्राप्ती होताच राणी रूपमती आपली अमानुष अट पूर्ण करण्यात माघार घेणार नाही, याची पक्की खात्री असल्यामुळे तो दु:खीकष्टी झाला. राजाच्या मुखावरील उदासपणा पाहून 'नैसर्गिकपणेच मला मृत्यू आला असता तर आपण काय करू शकला असता?'असा राजालाच प्रश्न विचारून गुणवती दिलासा देऊ लागली.

थोड्याच दिवसांत गुणवतीला सुंदर पुत्ररत्न प्राप्त झाले. प्रजेला आनंद झाला. राज्यात सर्वत्र राजपुत्राच्या जन्मोत्सवाचा जल्लोष सुरू झाला. प्रधानमंडळासह सर्वजण त्या जल्लोषात सहभागी झाले असताना राजा मात्र खिन्न मुद्रेने सिंहासनावर बसून विचार करीत होता. राणी रूपमतीच्या त्या अमानुष अटीची पूर्तता करण्याच्या संकटाने तो ग्रासला असतानाच राणी स्वत:च राजासमोर आली. तिला पाहताच साताजन्माची वैरीणच समोर ठाकल्याचा राजाला भास झाला. तेजस्वी सूर्यबिंबावर काळ्या ढगांचे मळभ यावे, तसा त्याचा कांतिमान चेहरा निराशेने काळवंडून गेला. राणीला त्याचे काही सुतक वाटण्याचे कारणच नव्हते. त्यामुळे निर्दयपणे राजाला खिजवत ती म्हणाली,

'महाराज, गुणवतीशी विवाह करून आपण माझा हट्ट पुरविलात, पण त्याच्याबरोबर माझी एक अट पुरविण्याचेही आपण वचन दिलेलं आहे, ते स्मरणात आहे ना?'

'राणीसरकार, आपली ती अत्यंत अमानुष अट आणि ती पुरी करण्याचं माझं ते आततायी वचन यांचं विस्मरण मला कधीतरी होणं शक्य आहे काय? गुणवतीशी विवाह झाल्यापासून

आजतागायत त्या स्मृती माझ्या मनाला इंगळी डसल्यासारख्या दंश करतात आणि अहोरात्र वेदना वाढवतात.'

राजाच्या बोलण्याचा राणीच्या मनावर मुळीच परिणाम झाला नाही. निष्ठूरपणे ती म्हणाली,

'महाराज, आता त्या वेदनांतून मुक्त होण्याची वेळ आलेली आहे. माझी अट पूर्ण केली की आपण त्या वेदनांतून कायमचे मुक्त व्हाल. त्यासाठी महाराजांनी गुणवतीच्या महालाकडे त्वरेनं निघावं.'

राणी रूपमतीच्या इच्छेनुसार राजा जड अंत:करणाने गुणवतीच्या महालात आला. गुणवती बाळराजाला स्तनपान देत बिछान्यावर झोपली होती. मातृसुखाचे आगळेच समाधान तिच्या चेहऱ्यावर विलसत होते. राजासह राणी रूपमती तिच्या महालात आल्याची चाहूल लागताच हलकेच बाळराजापासून दूर होत स्वत:ला सावरून अदबीने ती उठली. राजा-राणीला अत्यंत नम्रपणे नमस्कार केला. राजा-राणीने बाळराजाचे मुखावलोकन केले. राजाला क्षणभर वाटले की, बाळराजाचे मुख पाहिल्यानंतर तरी रूपमतीचे मन प्रेमाने द्रवेल आणि गुणवतीचा शिरच्छेद करण्याची अट ती मागे घेईल. पण दुसऱ्याच क्षणी रूपमती राजाच्या कमरेस लटकणाऱ्या तलवारीकडे बोट दाखवून राजास म्हणाली, 'महाराज, घ्या ती तलवार आणि माझी अट पूर्ण करा!'

राणीचे निर्दय उद्‌गार ऐकून राजा हताश झाला. वात्सल्यभावनेने ओथंबलेले त्याचे मन गुणवतीचा शिरच्छेद करण्यास मुळीच धजेना. तेव्हा राणी म्हणाली,

'महाराज, आपण माझी अट पूर्ण करण्याचे वचन दिलेले आहे. एक क्षुल्लक स्त्री आपल्या पुत्राची माता झाली, म्हणून महाराणीला दिलेल्या वचनाचा आपण भंग करणार काय?'

'राणीसरकार, आजवर महाराणीच्या प्रेमासाठी आम्ही अनेक विचित्र हट्ट पुरविले, पण आता एका राजमातेच्या मातृत्वभावनेच्या रक्षणासाठी आपण आमचा एक हट्ट पुरवा. ही तलवार घ्या आणि एका राजमातेचा शिरच्छेद करण्याचे वचन दिल्याच्या अपराधासाठी आपण आमचे शिर धडापासून वेगळे करा!'

राजाने घेतलेला पवित्रा पाहून चिडलेली रूपमती उद्‌गारली,

'आपण माझी अट पूर्ण करू शकत नसाल तर मी जगू शकणार नाही. आपण माझाच शिरच्छेद करा!'

राणी रूपमतीच्या तोंडचे ते दुराग्रही उद्‌गार ऐकून राजाचीही सहनशीलता संपली. मनात दबा धरून बसलेली सारी चीड उफाळून आली आणि निर्धाराने तो उद्‌गारला,

'राणीसरकार, आजवर नाइलाजाने आम्ही आपले अनेक विचित्र हट्ट पुरवीत आलो. आज आम्ही आपला शिरच्छेद करावा असा हट्टच असेल तर आमचाही नाइलाज आहे. पुन्हा एकदा विचार करा आणि उत्तर द्या. आम्ही आपल्या इच्छेची पूर्तता करण्यास सज्ज आहोत!'